|| अल्पारंभ: क्षेमकर:||

|| अल्पारंभ: क्षेमकर: ||
SWS Financial Solutions Pvt. Ltd.
Comprehensive Financial Consultancy & Services

Head Office : 2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle,
Near Hotel Curry Leaves, Gangapur Road, Nahik 422013

अंक : १९ वा    जानेवारी २०१९

गवाक्ष
......एक विचारमंच ! आर्थिक साक्षरतेसाठी

# Judging the Scheme Performance? Wait, Read This !!



A very common question always asked by the investors is like, "In the one year, returns on Mutual Fund Equity Investment is 10% whereas Market has grown by 20%, So why that my investment is not performing?"

Such question may arise in mind of investors which is a good sign of their activeness and alertness towards their investments.

There are 3 aspects on which the question can be answered.

**1) Fund Performance** If a particular Equity fund performance is to be evaluated then comparison of its performance with the performance of Sensex or Nifty index should not be the only criterion. In a particular fund scheme, there are generally several stocks which are not part of Sensex or Nifty stocks. Thus, performance of fund should always be compared with the respective Bench Mark index. After this comparison one may observe that though Sensex / Nitfy may have performed well, the bench mark index has not done that good. So, **Bench Mark Index is first aspect.**

**2) Period of Investment** The investment in mutual funds for the period of 1 to 2 years is considered as short-term investment period which is not sufficient to judge the performance of the scheme. The returns in the very first year may be very low or even can be high returns and both the cases can't be taken as criteria to judge the performance of the scheme. Also, one cannot ascertain that which category is going to outperform or low perform in the future. This is the reason why the portfolio should be diversified into Debt, Hybrid & Equity investment schemes. Equity fund gives growth in long term whereas Hybrid & debt funds provide stability. So Period of **Investment is the second aspect.**

**3) Purpose of Investment** This is supposed to be the most important but unfortunately the most neglected criterion. We, as Financial Advisor always request our clients to define purpose of the investment. For example, if someone is investing for retirement approaching after 20 years, then we insist not to track the scheme performance for at least 12-15 years and keep accumulating to the investment amount. Returns on the long-term investments in Mutual funds have paid the good returns. So **third aspect is Purpose of Investment.**

**Conclusion:**

Actually, Investing in Equity or Mutual Funds is like playing a Test Match. The more you stay on the crease; chances are more to make high scores. The Run Rate (Rate of Return) is not that important. If we continuously focus high Run Rate (returns), there are high chances of getting out at early stage. We just need to ensure we are playing with a good batsman irrespective of whether he is Virat, Sachin, Dhoni or Shikhar, Rahul or Rohit. We know all shall score high if any of them remain on crease for a longer time. As we don't know who is going to score more in the long run, we cannot assure high returns on any single scheme. Also, to be in the leading position, we need to do few adjustments in the batting strategy (Portfolio Balancing) leveraging on the situation offered from the opponents (Market).

Here, in this inning of your investments with you as a batsman, your Financial Advisor plays the role of Buddy on the pitch, who holds your hands in all situations and manages your emotions and hence your performance!!

Hence investment in Mutual Funds or Equity is playing like a Test Match where rate of return is just a check, whereas consistency and staying on the crease for long time is the key to WIN. Hold hand of right buddy to achieve Best Performance!!

**Mr. Neeraj Adbe,**
Head, Nagpur Branch,
S.W.S.F.S.P.L

|| अल्पारंभ: क्षेमकर: ||
SWS Financial Solutions Pvt. Ltd.
Comprehensive Financial Consultancy & Services
The time to repair the roof is when the sun is shining.

# सुयोग्य आर्थिक नियोजन ... अत्यावश्यक गरज



नमस्कार ! आज तुमच्यासमोर आमचा असा एक अनुभव मांडत आहे , ज्याद्वारे सुयोग्य आर्थिक नियोजन करणे किती महत्वाचे हे पुनः सुस्पष्ट होते आहे. (नोंद : या लेखातील नाव बदललेले आहे. )

नाशिकमधील प्रसाद हा नोकरीनिमित्त दुबईत राहणारा तरुण, व्यवसायाने सॉफ्टवेअर कन्सल्टंट आहे. आजतागायत बारा वर्षांपासून तो दुबईत कार्यरत आहे आणि आपल्या कुटुंबासोबत तो दुबईतच स्थायिक झालेला आहे. आपल्या नोकरीच्या ठिकाणी योग्य ती मेहनत करून व सचोटीने काम करून प्रसादने पुष्कळ पैसा कमाविला आणि त्याद्वारे तसेच काही गृहकर्जाची मदत घेऊन, भारतातील भविष्यातील वास्तव्यासाठी, त्याने ठाणे येथे एक फ्लॅट खरेदी केला. नियमित पगार चालू असल्यामुळे ह्या कर्जाचे हफ्ते वेळेवर भरले जात होते व सर्व काही सुरळीत चालले होते. अशातच एकेदिवशी त्याच्या वडिलांना हृदयविकाराचा त्रास झाला. डॉक्टरांनी वडिलांची बायपास सर्जरी करण्यास सुचविले. प्रसादने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार, वडिलांचे ऑपरेशन करवून घेतले. त्यावेळी, वडिलांचा कुठलाही आरोग्य विमा केलेला नसल्याने प्रसादला आपल्या गुंतवणुकीतून पैसे द्यावे लागले व यात प्रसादची सर्व गुंतवणूक संपली. दुर्दैव इथेच थांबले नाही. त्यानंतर प्रसादची नोकरीही गेली. नवीन नोकरीच्या शोधात असताना पुढील सहा महिने निघून गेले. परिवाराचा भार, जीवनावश्यक वस्तू आदीसाठी प्रसादला क्रेडिट कार्डचा वापर करावा लागला. दुबईतील महागाईचा सामना करताना क्रेडिट कार्ड चा वापर इतका जास्त होत गेला की त्याला क्रेडिट कार्डवर कर्ज घ्यावे लागले. पुढे सर्व बचतही संपुष्टात आल्यावर क्रेडिट कार्ड कर्जाचे हफ्ते थकले. तसेच ठाणे इथल्या फ्लॅटच्या गृहकर्जाचे हफ्तेही थकले व प्रसाद डिफॉल्टर झाला. डिफॉल्टर झाल्यामुळे त्याचे सिव्हील रेकॉर्ड खराब झाले. या आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी त्याने इतरत्र कुठे नवीन कर्ज घेण्याचा प्रयत्न केला. परंतु डिफॉल्टरचा शिक्का बसल्यामुळे प्रसादला नवीन कर्जही मिळेनासे झाले. शेवटचा पर्याय म्हणून नातेवाईकांकडे पैसे मागण्याची वेळ प्रसादवर आली. सुदैवाने नंतर त्याला इजिप्तमधून एक मोठा प्रोजेक्ट मिळाला आणि काही महिन्यांच्या कालावधीनंतर प्रसाद आर्थिक संकटातून बाहेर आला. परंतु या सर्व प्रकारात झालेला मानसिक त्रास, पैशाशी निगडीत आलेले आपल्याच माणसांचे वाईट अनुभव, त्याच्या आणि कुटुंबाच्या मानसिक खच्चीकरणास कारणीभूत ठरले.

**"आता आर्थिक नियोजनाच्या दृष्टिकोनातून प्रसादच्या काय चुका झाल्या ते बघुयात."**

१) आपली नोकरी / व्यवसाय कसाही असला तरी पुढील "**कमीतकमी सहा महिन्यांपर्यतच्या दैनंदिन खर्चाचा विचार करून, आपण तेवढी रक्कम बचत खात्यात कायम राहील याचा विचार केलाच पाहिजे.** प्रसादच्या बाबतीत हे होत नव्हते. पुष्कळ पगार आणि दुबईतील वास्तव्यचा पुष्कळ खर्च यांचा तोल न सांभाळता आल्याने, कोठल्याही नियमित / अनियमित / अतार्कीक खर्चासाठी कुठलीही आर्थिक व्यवस्था त्याने केलेली नव्हती.

२)"**कुटुंबातील सर्व सदस्यांच्या योग्य तो आरोग्य, जीवन तसेच अपघाती विमा हा अत्यावश्यक आहे.**" तो नसल्यास, काही दुर्दैवी प्रसंगामुळे आतापर्यंत केलेली सर्व बचत किंवा गुंतवणुक संपुष्टात येऊ शकते. प्रसादच्या वडिलांचा आरोग्य विमा नसल्याने, त्यांच्या उपचारादरम्यान, त्याने केलेली सर्व बचत तसेच गुंतवणूक पूर्णपणे वापरली गेली आणि त्यात नोकरीही गेल्याने आर्थिक संकट उभे ठाकले.

३) आपण करीत असलेली "**गुंतवणुक, ही महागाईचा दर विचारात धरूनच केलेली असली पाहिजे.**" ते न झाल्यास अशा गुंतवणुकीचा उपयोग, महागाईचा सामना करताना होतच नाही. प्रसादने केलेल्या बचत आणि गुंतवुकीच्या प्रकारात हा विचार झालाच नव्हता.

या सर्वातून, एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की पैसा कमावणे हे जितके महत्त्वाचे आहे तितकेच त्याचे व्यवस्थापनही !!"**सर्व प्रकारचा सुयोग्य विमा, अत्यावश्यक खर्चासाठी तरतूद, गरजांप्रमाणे सुयोग्य गुंतवणुकीचे माध्यम हे सर्वच आर्थिक नियोजनाचे महत्वाचे घटक आहेत.**" असे नियोजन हे आर्थिक, कौटुंबिक, परिवारातील सदस्य संख्या, विशिष्ठ गरजा, घेतलेले कर्ज आदी बऱ्याच बाबींवर अवलंबून असते आणि म्हणून ते करण्यासाठी योग्य, तज्ञ आर्थिक सल्लागाराची मदत घेणे केव्हाही चांगले !!

या अनुभवातून शिकून तुम्हीही, ऐनवेळी च्या आर्थिक संकटाचे नियोजन केलेले आहे, हे तपासून बघाल ना? मदतीस आम्ही सदैव तुमच्यासोबत आहोत !! कधीही हाक घाला....धन्यवाद !!

**ऋषभ भरत सोनवणे.**
S.W.S.F.S.P.L.

## हरवलेले जादुई शब्द



तुम्हाला आठवतंय, जेव्हा कधी आपण लहानपणी खेळताना पडलो, रडायला लागलो किंवा कोणत्यातरी वस्तूमुळे आपल्याला लागलं, तर आई/बाबा आपल्याला जवळ घ्यायचे आणि कोणत्यातरी दिशेला बोट दाखवुन म्हणायचे, ''काही झालं नाही, तो बघ उंदीर पळाला!'' आणि आपणही त्या नसलेल्या उंदराकडे बघत, लागलेलं विसरून जायचो आणि पुन्हा खेळायला लागायचो!! ज्या वस्तूमुळे आपल्याला लागलं त्या वस्तूला आई/बाबा हळूच चापट द्यायचे आणि त्या जागेकडे/वस्तूकडे डोळे वटारून म्हणायचे, ''हाट रे, आमच्या सोनूला मारतोस काय....'' आणि असं म्हंटल्यावर आपल्याला ही आनंद व्हायचा. असं वाटायचं कि आपल्याला कोणीही, काहीही केलं तरी त्याला ओरडायला आपले आई-बाबा आहेत!! कधी आपल्याला काही चावलं/लागलं, कि ते त्यावर 'फूSSS' असं करून फुंकर मारायचे आणि म्हणायचे, काही नाही... आता फूSSS केलंय ना, मग'बरं होईल हं ते .

पण का कुणास ठाऊक, जसे जसे मोठे होत गेलो, तसं तसं आई-बाबांना या शब्दांची आवश्यकता वाटेनाशी झाली. त्यांनी ते शब्द वापरणं बंद केलं आणि आपणही ते ऐकणं! मोठं झाल्यावर वाटायला लागलं कि काय बालिशपणा होता तो!! अस 'फूSSS' करून कधी जखम बरी होते का? पण खरं तर एवढं मोठं होऊनही आपल्याला त्या शब्दांची खरी ताकद कळलेलीच नसते. आपली जखम त्यांच्या 'फूSSS' नी नाही बरी व्हायची, तर त्या हळुवार 'फूSSS' मधल्या प्रेम, माया आणि विश्वासाने ती बरी व्हायची. खरं तर ते शब्द हे आपलं लक्ष त्या दुःखापासून विचलित करण्यासाठी असायचे. त्या शब्दांमुळे आपण दुःख विसरून पुन्हा एकदा दंगा करायला तयार व्हायचो.

जसे मोठे झालो तसे आपण सो कॉल्ड 'ओपन वर्ल्ड'मध्ये आलो. कॉलेज, नोकरी, छोकरी, स्पर्धा, करियर, मान-मरातब, पैसा या आणि अशा अनेक गोष्टींमधे गुरफटत गेलो. रोज अनेक शारीरिक, मानसिक जखमा व्हायला लागल्या. अनेक गोष्टी खुपू लागल्या. धर्मवाद, जातीवाद, राजकारण, व्यसनं, भोंदूगिरी, गरीबी, गुंडगिरी, उच्छृंखलता, दहशतवाद जीवघेणी स्पर्धा लचके तोडायला लागली. रोज नवी आव्हाने समोर येऊ लागली. रोज नवनवीन कृत्रिम गरजांना बळी पडायला लागलो. पण दुर्दैवाने या वेळी, ''काही झालं नाही, उंदीर पळाला, असं म्हणुन त्या सर्व दुःखांकडे डोळे वटारून बघायला'', ''फूSSS केलंय ना, मग बरं होईल ते'' असं म्हणून त्या जखमांवर फुंकर मारायला कोणी, कोणी नव्हतं.

ते जादुई शब्द हरवले होते आता.... कदाचित असते तर हे सारं घडलंच नसतं !!

आज मोठे झाल्यावर, त्या 'बालिश' शब्दांचं मूल्य आता कळायला लागलं. ते शब्द फक्त सांत्वन करणारे नव्हते तर सामर्थ्य देणारे होते. आपलं दुःख विसरून जगापुढे पुन्हा दिमाखात उभं राहायला शिकवणारे, आपल्या जखमा विसरून पुन्हा कामात गुंतवणारे शब्द होते ते !! वर वर पोरकट वाटणाऱ्या या शब्दांमध्ये, मिळणाऱ्या प्रेम आणि विश्वास यांचं प्रचंड सामर्थ्य होतं.

कधीतरी वाटतं कि कितीही मोठे झालो आणि कितीही मोठी संकटे आली, तरी जर पुन्हा, कोणी, ''उंदीर पळाला'', ''हाट रे'', 'फूSSS' हे शब्द उच्चारले, तर सारी संकटे, सारी दुःखें पळून जातील, त्या लहानपणीच्या अदृष्य उंदराप्रमाणे आणि पुन्हा या नियतीशी दोन हात करायला, पुन्हा एकदा त्या वास्तविक जगामध्ये दंगा करायला आपण सज्ज होऊ. माणूस कितीही मोठा झाला तरी, त्याला कधी ना कधी त्या 'फूSSS' ची गरज पडतेच. अगदी आई बाबांना सुद्धा. त्याला त्याच्या विश्वासू माणसाकडून मिळालेली 'फूSSS' नवसंजीवनी देऊन जाते.

जाता जाता 'फूSSS' द्वारे आपले सांत्वन करणाऱ्या आई-वडिलांप्रती समर्पित असणारी, वि. वा. शिरवाडकर यांच्या कवितेतील एक ओळ आठवते:

**''मोडून पडला संसार तरी, मोडला नाही कणा !!**
**पाठीवर हात ठेऊन फक्त लढ म्हणा!!''**

**श्री. निखिल हरकारे ,**
गृह कर्ज विभाग,
S. W. S. F. S. P. L.



**डिसेंबर २०१८ S. W. S. येथे वयम् वाचक कट्टा उपक्रमाचे उद्घाटन श्री. शंतनु गुणे यांच्या हस्ते**



**जानेवारी २०१९, विवेकानंद केंद्र प्रशिक्षण व सेवा प्रकल्प पिंपळद, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक येथे वयम वाचक कट्टा हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.**

# आमच्या बद्दल, थोडेसे....

## सिंगल विंडो सर्व्हिसेस : आमचा प्रवास

आर्थिक सल्ला व गुंतवणूक क्षेत्रातील आमचा प्रवास १९९५ पासून सुरु आहे. या क्षेत्रातील सर्व सेवा, ग्राहकांना एकाच छत्राखाली उपलब्ध व्हाव्यात, या उमद्या हेतूने सिंगल विंडोचा प्रवास सुरु झाला. कंपनी लवकरच पंचविसाव्या वर्षात पदार्पण करीत आहे. सोपी, ग्राहकाभिमुख, पारदर्शी आणि विश्वासार्ह सेवा ही आमची वैशिष्टये असून आज कंपनी व्यावसायिक उत्कृष्टतेचे प्रतीक म्हणून ओळखली जाते आहे. जोडल्या गेलेल्या ग्राहकांना आर्थिक साक्षरतेकडून, आर्थिक स्वातंत्र्यापर्यंत नेण्यासाठी, आमची अनुभवसंपन्न टीम, सदैव प्रामाणिकपणे कार्यरत आहे !

## सिंगल विंडो सर्व्हिसेस: आमच्या सेवा

- ✯ आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आवश्यक असणाऱ्या गुंतवणूक सेवा ( जन्म, शिक्षण, विवाह, सेवानिवृत्ती,वारसाहक्क इ.)
- ✯ जीवन विमा, वाहन, आरोग्य आणि अपघात विमा
- ✯ करनियोजन आणि कर्ज सेवा
- ✯ व्यवसाय किंवा इतर विशिष्ट उद्देशासंदर्भात गुंतवणूक सेवा

## सिंगल विंडो सर्व्हिसेस : निवडी मागील प्रयोजने

- ✯ सेबी अधिकृत गुंतवणूक सल्लागार
- ✯ २४ वर्षांचा प्रदीर्घ, संपन्न अनुभव.
- ✯ इंजिनीअरिंग, चार्टर्ड अकौंटन्सी सारखी पार्श्वभूमी असणारी, अनुभवी आणि कार्यक्षम सल्लागारांची टीम
- ✯ विश्वासार्ह आणि नि:पक्षपाती सल्ला
- ✯ वैयक्तिक तसेच संपूर्ण कौटूम्बिक, व्यवसाय, विश्वस्थ संस्था यांना सेवा देण्याचा संपन्न अनुभव
- ✯ सोपा, ग्राहकाभिमुख,पारदर्शी आणि नैतिक व्यवहार
- ✯ पुणे, मुंबई , नागपूर, वर्धा आणि इतर उद्योन्मुख शाखा

## सिंगल विंडो सर्व्हिसेस: Vision Statement

The philosophy and vision of SWS is to bring Happiness and Peace to billions. With customer centric approach, SWS is committed to facilitate journey towards Financial Freedom by offering top class, comprehensive Financial Planning Services.


॥ अल्पारंभ: क्षेमकर: ॥

**SWS Financial Solutions Pvt. Ltd.**

Comprehensive Financial Consultancy & Services

Head Office : 2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle, Near Hotel Curry Leaves, Gangapur Road, Nahik 422013



**SWS Mumbai Branch**
07, Zee Usha Swapna, Mahant Road Junction,
Hanuman Cross Road, No.1,
Vile Parle (East) Mumbai 400057
**Kishor Kale : 9869239940/ 9224433122**



**SWS Nagpur Branch**
Plot No. 30, Mandar Apartment,
Inline of Anandpurti Super Bazar,
Khamla-Jaitala Road, Nagpur - 440025.
**Neeraj Adbe : 8308833724**



**SWS Pune Branch**
Office No.1, Anand Corner,Anand Park,
Wadgaonsheri, Pune - 411 014.
**Swapnil Ekande : 9028735055 / 7720099241**



**SWS Wardha Associates**
C/o.S.Sardar, Seneguruji Nagar,
Bachelor Road, Wardha - 442001.
**Girish N. Wankhede : 9970835446**